# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-18.04.2026** **वार- शनिवार**

---

**पंतप्रधान नरेंद्र मोदी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज रात्री साडे आठ वाजता देशातील नागरिकांना संबोधित करणार आहेत.

**जागतिक वारसा दिन**

जागतिक वारसा दिनानिमित्त, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जनतेला समाज माध्यमावरून शुभेच्छा दिल्या आहेत. आपला गौरवशाली इतिहास, संस्कृती, कलेचा अमूल्य वारसा जपूया आणि विकसित महाराष्ट्र घडवूया, असं आवाहन  त्यांनी केलं आहे. केंद्रीय सांस्कृतिक आणि पर्यटन मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांनीही देशातील नागरिकांना, ऐतिहासिक आणि वारसा स्थळांना भेट देताना, ती ठिकाणे स्वच्छ आणि सुरक्षित ठेवण्याची शपथ घेण्याचं आवाहन केलं आहे.

**ATS**

एटीएस अर्थात ऑटोमॅटिक टेस्टिंग स्टेशन प्रणाली बंद असल्यामुळे रखडलेल्या वाहन परवाना नूतनीकरण प्रक्रियेला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी यावर्षी ऑक्टोबर अखेरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. यामुळे राज्यातल्या टेम्पो, स्कूलबस, रिक्षा यांचा परवाना नूतनीकरण करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. एटीएस प्रणाली अद्ययावत करण्यासाठी बंद करण्यात आली होती, त्यामुळे परवाना नूतनीकरणाची प्रक्रिया ठप्प झाल्यानं, १५ लाख वाहतूक व्यावसायिकांची गैरसोय होत होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात पत्र लिहून विनंती केली होती.

**चापेकर स्मृतीदिन**

भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासात चापेकर बंधूनी देशासाठी दिलेलं योगदान देशवासियांना सतत प्रखर देशभक्तीची प्रेरणा देत राहील असं प्रतिपादन पिंपरी चिंचवडचे महापौर रवि लांडगे यांनी केलं. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीनं क्रांतीवीर दामोदर हरी चापेकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त आज चिंचवड इथल्या क्रांतीवीर चापेकर बंधुंच्या समूह शिल्पास लांडगे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.  या प्रसंगी उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षेनेते भाऊसाहेब भोईर आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

**जलतरण तलाव**

पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांसाठी जास्तीत जास्त क्रीडा सुविधा देण्याचा त्याचबरोबर क्रीडा साधनं आधुनिक आणि दर्जेदार करण्याचा आमचा सातत्यपूर्ण प्रयत्न असून मोहननगर इथल्या जलतरण तलावाचं नूतनीकरण हे त्याच दिशेनं उचललेलं महत्त्वाचं पाऊल आहे असं प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी आज केलं.

श्री छत्रपती राजर्षी शाहू महाराज जलतरण तलावाचा लोकार्पण सोहळा लांडगे यांच्या हस्ते पार पडला, त्यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, आमदार उमा खापरे, शंकर जगताप यांच्यासह उपमहापौर शर्मिला बाबर आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

**कार्यशाळा**

अनाहत कल्चरल फाऊंडेशन पुणे आणि गायत्री वॉइस केअर रिसर्च सेंटर आयोजित "आवाज ही पहचान है' ही आवाजाची कार्यशाळा राजवाडे सभागृह, भारत इतिहास संशोधन मंडळ इथं, उद्या संध्याकाळी साडेचार ते सात यादरम्यान होणार आहे. या कार्यशाळेत, आवाजाची काळजी कशी घ्यावी याविषयी डॉक्टर मिलिंद भोई मार्गदर्शन करणार आहेत. जेष्ठ गायिका आशा खाडीलकर प्रमुख पाहुण्या असणार आहेत तर अनेक मान्यवर गायक दूरस्थ पद्धतीनं यात सहभागी होणार आहेत. प्रवेश विनामूल्य असला तरीही नाव नोंदणी आवश्यक आहे. इच्छुकांनी 98 81 43 63 35 या संपर्क क्रमांकावर संपर्क करावा असं आवाहन आयोजकांनी केलं आहे.

**काकतकर निधन**

दूरदर्शनचा सुवर्णकाळ गाजवणारे ज्येष्ठ निर्माते, दिग्दर्शक आणि कवी अरुण काकतकर यांचं अल्प आजारानं आज दुपारी पुण्यात निधन झालं. ते ७९ वर्षांचे होते. दूरदर्शनवर, 'शब्दांच्या पलिकडले' सारख्या अनेक दर्जेदार कार्यक्रमांची निर्मिती आणि दिग्दर्शन त्यांनी केलं. दूरदर्शनच्या पडघवली सारख्या अनेक चित्रपटांची निर्मिती आणि अनेक जाहिरातपटांचे दिग्दर्शनही त्यांनी केलं होतं. अनेक तरूण गायक गायिकांना त्यांनी आरंभीच्या काळात दूरदर्शन कार्यक्रमांत संधी दिली. पुण्यातील बालचित्रवाणीचे उपसंचालक म्हणून त्यांनी अनेक शैक्षणिक कार्यक्रमांची निर्मिती केली.

**हवामान**

पुणे शहर आणि परिसरात आज किमान तापमानात वाढ नोंदवली गेली. पुण्यात आज कमाल 37 अंश आणि किमान 22 अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. आज दुपारनंतर काही ठिकाणी आकाश ढगाळ झालं होतं. आज संध्याकाळी काही ठिकाणी वीजांसह हलका पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे. उद्या देखील अशाच प्रकारचं हवामान राहण्याचा अंदाज वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू, संध्याकाळी सहा वाजता, विविध भारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांतसह, नमस्कार.**